RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ५१] बुधवार, मे १७, २०२३/वैशाख २७, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक १५ मे, २०२३.

**अधिसूचना**

**दंतवैद्य अधिनियम, १९४८.**

क्रमांक मदंप-१२२१/प्र.क्र.८७/अधिनियम.—ज्याअर्थी, दंतवैद्य अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) च्या कलम २१ अन्वये महाराष्ट्र शासनाने, **शासन राजपत्र** दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्य दंत परिषद, (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त परिषद” असा करण्यात आला आहे) या परिषदेची स्थापना केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेच्या सदस्यांचा कालावधी दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी संपुष्टात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेवर नवीन सदस्य निवडण्यासाठी निवडणूका घ्यावयाच्या आहेत आणि म्हणून उक्त परिषदेचा पाच वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नवीन परिषदेची रचना होईपर्यंत प्रशासक नेमून निवडणूक प्रक्रिया राबवणे उचित होईल ;

आणि ज्याअर्थी, नवीन परिषदेची रचना होईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रशासकीय कामकाज सुरळीत चालावे यासाठी शासनाने डॉ. जगदीशचंद्र वठार, प्राध्यापक, शासकीय दंत महाविद्यालय, औरंगाबाद यांची उक्त परिषदेची उक्त अधिनियमानुसार असलेली सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन डॉ. जगदीशचंद्र वठार, प्राध्यापक, शासकीय दंत महाविद्यालय, औरंगाबाद यांची निवडणूक प्रक्रियेने परिषद नव्याने यथोचितरित्या गठित होईपर्यंत, प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे. डॉ. जगदीशचंद्र वठार यांनी प्राध्यापक, शासकीय दंत महाविद्यालय, औरंगाबाद या नियमित पदाचा कार्यभार सांभाळून आठवड्यातून दोन दिवस उक्त परिषदेचे कामकाज हाताळावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वैशाली सुळे,**
शासनाच्या उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th floor, New Mantralaya , Lokmanya Tilak Road, Mumbai 400 001, dated the 15th May, 2023.

*NOTIFICATION*

The Dentists Act ,1948.

क्रमांक मदंप-१२२१/प्र.क्र.८७/अधिनियम.—Whereas, under section 21 of The Dentists Act,1948 (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra has established the Maharashtra State Dental Council (hereinafter referred to as "the said Council") *vide* Government Notification dated 21st January, 2017 ;

And whereas, the term of the office of the Members of the said Council has been expired on 20th January, 2022 ;

And whereas, elections are to be held to elect new members of the said Council it is appropriate to implement the election process by appointing an Administrator until the new council is formed ;

And whereas, the Government of Maharashtra has decided to appoint Dr. Jagdishchandra Wathar, Professor, Government Dental College, Aurangabad as an Administrator, to perform all the duties as prescribed under the said act of the said Council to ensure smooth functioning, till the new Council is constituted.

Therefore, in exercise of the powers conferred, the Government of Maharashtra is appointing Dr. Jagdishchandra Wathar, Professor, Government Dental College, Aurangabad as an Administrator till the Council is constituted in a new manner, by proper election process. Dr. Jagdishchandra Wathar shall handle the affairs of the said council for two days in a week and shall dispense his duties of his regular post as Professor, Government Dental College, Aurangabad.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI SULE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.